66

Special Issue February 2018

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Bharatiya Vidya Mandir Amravati's

## Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist.Amravati


(Affiliated To Sant Gadge Baba Amaravati University,Amravati )

One Day National Conference

On

# Impact of Demonetization on Indian Economy

24th February 2018




Principal
G.S.Meshram

Chief Editor
Prof. Virag Gawande

Editor
Dr. Lajwanti R.Tembhurne

Organized By

**Department Of Economics**

Bharatiya Mahavidyalaya, Morshi Dist. Amravati

In Collaboration With

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati

Scanned with OKEN Scanner

67



14) निश्चलनीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास
प्रा. पंढरी जी. मोरे., ओंकारनगर नागपूर. || 51

15) विमुद्रीकरण आणि काळापैसा
प्रा.हेमराज चौधरी, आर्वी जि. वर्धा. || 53

16) निश्चलनीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
डॉ. अे. जो. वानखडे, रिसोड जि. वाशिम || 56

17) सर्वसमावेशी शाश्वत विमुद्रिकरण आवश्यक
प्रा. रविंद्र बा.शेंडे, वरोरा. || 58

18) निश्चलनीकरण आणि भ्रष्टाचार आणि काळापैशाचे प्रतिबंध
प्रा. डॉ. व्ही.व्ही. लाडे, तुकूम, चंद्रपूर || 61

19) विमुद्रिकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
प्रा. डॉ. रवि सोरते, पवन महंत || 65

20) विमुद्रीकरण आणि सामान्य जनता
सौ. दिपाली पडोळे, उत्तमनगर अमरावती || 69

21)नोट बंदीचे विधायक व विघातक परिणाम
प्रा. डॉ. मंमता आर. साहु, रोहणा, जि. वर्धा || 72

22) विमुद्रीकरण : एक आर्थिक/ अध्ययन
प्रा. डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे, मोर्शी || 74

23) विमुद्रीकरणाचा सर्वसामान्य व्यक्तिंवर परिणाम
प्रा.जगदीश वाटामोडे, नागपूर || 77

24) विमुद्रीकरण आणि काळ्य पैशावरील त्याचे परिणाम
ज्ञानेश्वर बापूराव जांभुळे, परेल मुंबई || 80

25) नोटबंदीचे उद्देश, फायदे / नुकसान
प्रा. एम. यु. अर्जुने, नेर || 83

26) Demonetization Special effect on Banking sector [Bank loan]
Dr. Jyoti Pande [ Rai], Distt. – Bhandara || 86

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
February 2018 Special Issue


17

# सर्वसमावेशी शाश्वत विमुद्रिकरण आवश्यक

प्रा. रविंद्र बा.शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय वरोरा.

***********

विमुद्रिकरण — २०१६ नुसार ५०० आणि १००० रू च्या नोटा चलनातून काढुन टाकण्यात आल्या आहे. त्यामुळे काळा पैसा निर्मितीची सर्व मार्ग बंद झाले नसले तरी काळा पैसा निर्माण करण्याची सुलभ व सोपी वाट रोखली गेली आहे हे खरे आहे. काळया पैशाव्दारे चलन व्यवहाराला आतोनात गती मिळत असली तरी मोठया नोटा फक्त काळया व्यवहारासाठी वापरण्यात येतात असे समजणे चुकीचे आहे. परंतु मोठया नोटा ऐवजी रोखमुक्त व्यवहार अधिक झाल्यास काळा पैसा निर्माण होण्याचा राजमार्ग कायमचा बंद होईल.

भारतीय अर्थव्यवस्था निरोगी राखण्यासाठी जे विविध उपाय सुरू आहे. यामध्ये बॅकांचे राष्ट्रीयीकरण, नविन आर्थिक धोरण, राजकोपीय आणि मौद्रीक धोरण, विमुद्रिकरण — १९४६, १९७८ आणि २०१६, संरक्षण, शाश्वत विकास, सर्वसमावेशक विकास, वस्तू व सेवा कर अशा सर्व उपायांना सदैव लोकांचा पाठींबा मिळण्याकरीता सर्वसमावेशकतेचा समग्र विचार अर्थव्यवस्थेत कायम टिकणे आवश्यक आहे.

विकेंद्रिकरणाला उत्तेजन देऊन उत्पन्नाचा भाग मोठा करण्याची ताकद सर्वसमावेशक विकासात आहे. पुढे निर्माण होणारे विमुद्रीकरण सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रीकरण असावयास हवे. ज्यामूळे काळा पैसा निर्माण होण्याचा राजमार्ग कायमचा बंद होऊन गरीबातील गरीब व्यक्ती विकासाचा प्रतिनिधी किंवा घटक म्हणून कार्य करेल.

**विमुद्रिकरण म्हणजे —**

अर्थव्यवस्थेतील विशिष्ट चलन भ्रष्टाचार, काळा पैसा कमी करण्यासाठी काढुन टाकणे म्हणजे विमुद्रिकरण होय.

**सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरण —**

भ्रष्टाचाराचा राजमार्ग कायमचा बंद करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या सर्व मोठया नोटा चलनातून काढूण टाकणे आणी रोखमुक्त व्यवहाराला उत्तेजन म्हणजे सर्वसमावेशी शाश्वत विमुद्रिकरण होय.

**संशोधनाची उदीष्टये —**

१) ८ नोव्हेंबर २०१६ च्या विमुद्रिकरणातील गुण व दोषांचा अभ्यास करणे.

२) सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरणाचा पर्याय सुचविणे

३) आर्थिक व्यवहारांना अधिक गती देणारे सुरक्षित बॅकींग जाळे आवश्यकतेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गश्हीते —**

१) मोठया चलनी नोटा या केवळ काळया व्यवहारासाठी वापरल्या जातात असे अजीबात नाही.

२) रोकडविरहीत अर्थव्यवस्था आणि विकास यांचा जवळचा संबंध आहे.

३) रोकडविरहीत व्यवहार समावेशी शाश्वत विमुद्रिकरणाचा आधार आहे.

४) काळा पैसा नवीन ग्राहक निर्माण करीत नाहीत.

**संशोधन पध्दती —**

सर्वच देशात रोखमुक्त अर्थव्यवस्थेचा प्रयत्न सुरू आहे. भारत—सुध्दा याला अपवाद नाही. पुढील विमुद्रिकरण हे सर्वसमावेशी शाश्वत विमुद्रिकरण हवे. सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरण आणि विमुद्रिकरण २०१६ चे विश्लेषण करण्यासाठी दुय्यम स्त्रोतामधून माहीती घेण्यात आली आहे. यात विविध संदर्भ पुस्तके, शासनाचे अहवाल, विमुद्रिकरण २०१६, इंटरनेट, मासीके, वर्तमानपत्रे. इत्यादींचा आधार घेऊन विश्लेषण केले आहे.

**०८ नोव्हें २०१६ च्या विमुद्रिकरणातील गुण व दोष :—**

माननिय पंतप्रधानांनी ०८ डिसेंबर २०१६ रोजी ५०० आणि १००० रूपयांच्या नोटा चलनातुन बाद



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
February 2018 Special Issue
059

करण्याचा निर्णय जाहीर केला. आणि सर्वसामान्य व्यक्तीस ५० दिवसासाठी नव्हे तर अजूनही दैनंदीन जीवनातील आजीवन कारावास सुरू आहे असे म्हणणे खोटे ठरणार नाही. पुर्वी रूपयाचं धान्य आणायला पिशवी लागायची, ते आज रूपयाच धान्य खिश्यात मावेल येवढे मिळते. महागाईचा प्रश्न दुसऱ्या महायुध्दापासून सुरू झाला आहे व १९९० नंतर त्याला मोठा वेग प्राप्त झाला आहे. विमुद्रिकरण — २०१६ मार्फत सुध्दा ''भाववाढ'' नष्ट न होता भाववाढीची आरडाओरड सुरूच आहे. आपका साथ — हमारा विकास ही संकल्पना विस्तश्त बनत आहे.

**गुण :—**

तात्पुरत्या मालपट्टीमधील गुण विमुद्रिकरण — २०१६ मध्ये समाविष्ट आहे.

१) देशाच्या कश्त्रिम विकास दरात वाढ २) जनधन खाती वाढली ३) आर्थिक समावेशनाला मदत ४) समांतर अर्थव्यवस्थेला आळा. (अल्पकालीन) ५) किंमत स्थीरतेसाठी केवळ सरकार जबाबदार बॅका नाही असे समिकरण तयार. ६) रोकडविरहीत अर्थव्यवस्थेला प्राधान्य विविध ॲप्सचा वापर. उदा. भिम ७) विमुद्रिकरणाअंतर्गत गोळा झालेला पैसा व वापर योग्य विल्हेवाट. ८) खाजगी बॅकाचा थकीत कर्जाचा भाग कमी बनला.९)GST च्या अंमलबजावणीसाठी प्रमूख आधार. हे सर्व फायदे ''पुर आलेल्या जमीनीवर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घर बांधल्यासारखे आहे'' ही गोष्ट खरी आहे. वास्तविक विकासाठी सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरणच गरजेचे आहे ज्यात मोठया नोटा चलनातून काढून टाकून भ्रष्टाचाराचा राजमार्ग रोखमूक्त व्यवहाराने बंद होतो. अशा नव्या विमुद्रिकरणाची अपेक्षा सर्वसामान्य व्यक्ती करीत आहे. नव्या विमुद्रीकरणात आर्थिक व्यवहारातील दोष कमी राहील. अर्थव्यवस्था निरोगी सदकाळ राहील अशी अपेक्षा नव्या विमुद्रिकरणातून करणे कठीन नाही.

**दोष :—**

१) विमुद्रिकरणाअंतर्गत २००० रूपयाच्या नोटेनी पर्यायी भ्रष्टाचाराची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे.

२) 'चोर सोडून सन्याशी व्यक्तीला शिक्षा'' विमुद्रिकरणातून दिसत आहे. सर्वसामान्य व्यक्ती आजही विमुद्रिकरणाच्या धक्यातुन सावरला नाही.

३) रोखमुक्त व्यवहाराला उत्तेजन मिळत असतांना विमुद्रिकरणामुळे ''रोखमुक्त व्यवहार आणि पेनॉल्टी'' असे समीकरण उपलब्ध करून दिले आहे. उदा. मिनीमम बॅलेन्स, चार्जेस, व्याजदरात घट.

४) सार्वजनिक क्षेत्रातील बॅकांच्या बुडीत कर्जाचा भाग वाढविण्यात विमुद्रिकरणाची बरीच मदत झाली आहे. संभाव्य बुडीत कर्ज वाढण्यास निश्चितपणे हे विमुद्रिकरण पोषक आहे.

५) भारतीय अर्थव्यवस्थेत काळा पैसा, भ्रष्टाचार अजूनही सुरू आहे हा सर्वात मोठा धोका दिसून येत आहे.

६) राजकीय हस्तक्षेप बॅकींग व्यवहारात वाढून, बॅकांची स्वतंत्र्यता नावापुरती शिल्लक राहली आहे. सरकारच्या हातात राजकोषीय धोरण असतांना सरकारने मौद्रीक धोरणाकडे परस्परपुरक हेतुने पाहणे गरजेचे आहे. कुठल्याही पुर्वतयारीशिवाय नोटाबंदी आमलात आणल्यामुळे देशाच्या विकासाला फटका बसला आहे.

७) विमुद्रीकरणामुळे अर्थव्यवस्थेतील गुणकप्रभाव प्रक्रीया ठप्प झाली आहे.

८) ५०० व १००० रूपयाच्या नोटा बंद होऊनही त्यांचा हिशेब जूळला नाही. यामुळे कश्त्रिम विकासाला चालना मिळत आहे आणि वास्तविक विकास धोक्यात येत आहे.

९) सर्वसमावेशकता आपली संस्कश्ती असतांना केंद्रिकरणाला मदत विमुद्रिकरणातून झाली आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब — आर्थिक विषमता अधिकच वाढत जात आहे.

१०) विमुद्रिकरण — २०१६ अयोग्य तात्पुरती मालपट्टी आहे कायमस्वरूपी उपाययोजनेची सोय हयात नाही.

११) आर्थिक शांतता आणि सलोख्याने संबंध नष्ट होऊन महागाई कायम आहे.

**रोखमुक्त अर्थव्यवस्थेचे फायदे :—**

भारतीय अर्थव्यवस्था पूर्ण विकसीत अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रमण करीत आहे.परंतु अर्थव्यवस्थेला काळा पैसा भ्रष्टाचार, दहशतवाद, बेकायदेशीर मालमत्ता इत्यादी गोष्टीचे ग्रहण लागले आहे.



Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® February 2018 Special Issue 060

डिजिटल व इलेक्ट्रॉनिक व्यवहारात अनेक आर्थिक व्यवहार हे औपचारीक व्यवस्थेतून केले जात असल्याने त्यामुळे अनेक फायदे आहेत. रोखमुक्त व्यवहार वाढविणे कठीण असले तरी वित्तीय समावेशनासाठी, किंमत स्थिरतेसाठी सर्वसमावेशक व शाश्वत विकासासाठी आवश्यक बाब आहे. रोखमुक्त व्यवहाराचे पुढील फायदे आहेत.

१) पैसे देण्याची सोयीची पध्दत २) कमी जोखीम ३) नोटा छापण्याचा खर्च कमी ४) गुन्हांचे प्रमाण कमी/शून्य ५) बॅकीग क्षेत्राला लाभ ६) समांतर अर्थव्यवस्था नष्ट ७) पारदर्शकता ८) चलनाच्या बाहय मूल्यात वाढ ९) वेळ व पैसा यात बचत १०) लोकांचा बॅकींग क्षेत्रावरचा विश्वास कायम आणि वाढ ११) उत्पन्नाची योग्य विल्हेवाट व विकेंद्रीरणाला उत्तेजन १२) स्वत:ची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रत्येकाला आनंद १३) अनेक आर्थिक संबंध विस्तश्त आणि विकसीत १४) मानवी विकास निर्देशांकात दुरस्तीकरण. १५) अर्थव्यवस्थेची गुणकप्रभाव कार्यसंस्कश्ती विकसीत. १६) कुठल्याही वेळी कुठेही उदा. तिकीटे खरेदी करणे १७) इतर रोख रखमेच्या सहाय्याने व्यवहार न करणे म्हणजेच रोखमुक्त व्यवहार होय. भविष्यकालीन सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरणासाठी रोखमुक्त अर्थव्यवस्था आधार किवा ब्रिजची भुमिका ठरणार. आहे. बॅकींग सेक्टरसाठी खुप — खुप मोठी उपलब्धी तसेच आव्हाणाची ही गोष्ट नक्कीच आहे. परंतु स्विकारणे व वाढ करणे आवश्यक आहे.

**भविष्यातील सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरण — सर्व मोठया नोटा बंद आणि चेकचा वापर —**

हजारो कोटी रूपयांची वार्षिक उलाढाल असलेल्या या खंडप्राय देशात लहान नोटांच्या परिमाणात सर्व आर्थिक व्यवहार करणे शक्य आहे काय? या प्रश्नाचे उत्तर भविष्य काळासाठी आज सकारात्मक असेच दयावे लागते. त्यामुळे मोठया नोटा छापण्याचा विचार अर्थव्यवस्थेत होऊ नये. शेअर मार्केटमध्ये लाखो रूपयाच्या उलाढाली केवळ ''जबानी'' वर होऊ शकतात मग लाखो, करोडो रूपयाचे व्यवहारसुध्दा चेकने व्हायला कोणतीही अडचण नाही. अडचण असेल तर ती फक्त हा व्यवहार उघड होणार हीच आहे. चेकनी ''ऑन'' देता येणार नाही. लाच देता—घेता येणार नाही. हे व्यवहार इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांकडून लपवता येणार नाहीत हीच अडचण होईल पण काळा पैसा नष्ट करायचा म्हटला की असे होणे संयुक्तीक आहे. रोखमुक्त व्यवहाराला चालना मिळावी म्हणून नव्या मोठया नोटा छापण्याऐवजी हळूहळू चलनातील दोनशे रूपयाच्या नोटा सुध्दा कमी कराव्यात त्यामुळे फार मोठया व्यवहारासाठी सुध्दा पुरेशा प्रमाणात (२००) दोनशेच्या नोटा उपलब्ध होणे कठीण व्हावे म्हणजेच आपोआपच सर्व मोठमोठे व्यवहार बॅकेमार्फत होऊ लागतील. बॅकांना अशा या व्यवहारावर जास्त चांगले नियंत्रण ठेवणे शक्य होईल व काळा पैसा निर्मितीचा एक राजमार्ग कायमचा बंद होईल. असा सर्वसमावेशी विकासाचा रस्ता तयार झाल्यानंतर श्रीमंत आणि गरीब आनंदाने चालत जाणार आणि प्रत्येक पिढीतील आर्थिक जीवन आंनदायी असणार हयात कुठलीही शंका नाही. लोकांचे नियंत्रण चलन वेगावर (छोटया चलनाच्या) हयावेळी असणे आवश्यक आहे. म्हणजेच गरजांचा भाग मर्यादित असणे आवश्यक आहे. त्यामूळे किंमत स्थिरतेला अधिक प्रोत्साहन मिळेल. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे ''सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरण'' अंमलबजावणीत येत असतांना काही महीने अगोदरच (साधारणता एक वर्ष) पुर्वसुचना मिळणे आवश्यक आहे.

**समारोप**

केंद्रीय बॅकेच्या हातात विविध साधने असतांना किंमत स्थीरता निर्माण न होता भ्रष्टाचार, काळा पैसा मोठया प्रमाणात निर्माण झाला आहे. ०८ नोव्हेंबर २०१६ चे विमुद्रिकरणही तात्पुरती मलमपट्टी ठरली आहे. तात्पुरती मलमपट्टी काळया पैशाबाबत न वापरता कायम स्वरूपी उपाययोजना भविष्यात वापरने गरजेचे आहे. त्यासाठी सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरणाची (ज्यात काळया पैशाचा राजमार्ग कायमचा बंद यासाठी चलनातील मोठया नोटा बंद करून रोखमूक्त व्यवहाराला उत्तेजन म्हणजे सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरण होय) आवश्यकता आहे. सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरणामुळे बॅकांच्या नियंत्रणाचा भाग मोठा होईल. केंद्रीय बॅकेच्या हातात असलेल्या सर्व गुणात्मक, मात्रात्मक, प्रत्यक्ष नियंत्रणाच्या साधनाचा परिणाम वाढेल.



Scanned with OKEN Scanner

दही बनवत असताना ''विर्जन'' नावाचा जो प्रकार चालतो. अगदी त्याप्रमाणे सर्वसमावेशक शाश्वत विमुद्रिकरणाचा वापर होईल.

मोठया नोटा चालनातुन काढून टाकल्यानंतर मोठ – मोठे व्यवहार छोटया चलनाच्या माध्यमातून कठीन होऊन रोखमूक्त व्यवहाराला उत्तेजन मिळणार आहे. पारदर्शकता निश्चितच वाढेल व पूढे भारतीय अर्थव्यवस्थेत विकेंद्रिकरण वाढून, उत्पन्नाची योग्य विल्हेवाट होऊन भारतीय अर्थव्यवस्थेत पूर्ण विकसीतपणा २०३०, २०४० पर्यंत येणार या अंदाजासाठी अर्थशास्त्रज्ञाचीच गरज उरणार नाही. सर्वसामान्य मनुष्य सुध्दा पूर्ण विकसीत अर्थव्यवस्थेबाबत अंदाज व्यक्त करू शकणार हे सत्य आहे. भारताची १२१ कोटी लोकसंख्या अशा या सर्वसमावेशी शाश्वत विमुद्रिकरणाच्या प्रतिक्षेत आहे.

संदर्भग्रंथ –

१) योजना, फेब्रुवारी – २०१७, अंक ७

२) वित्तीय संस्था आणि वित्तीय बाजार – हिमालया पब्लिकेशन, डॉ.श्री.आ.देशपांडे, डॉ.विनायक श्री.देशपांडे.

३) भारतीय अर्थव्यवस्था – प्रतियोगिता दर्पण.

४) अर्थसंवाद – खंड २ रा, अंक १ ला.

□□□

**18**

# निश्चलनीकरण आणि भ्रष्टाचार आणि काळापैशाचे प्रतिबंध

प्रा. डॉ. व्ही.व्ही. लाडे

सहयोगी प्राध्यापक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याल, तुकूम, चंद्रपूर

**********

**Keyword :-** काळा व्यवहार, निश्चलनीकरण, करनियम, करचुकवेगिरी, रोकड विरहित व्यवहार, व्रिनिमय, दश्ष्टचक्र, चलनवाढ, लाच–लुचत, ए.सी. बी. साफडा, उलाढाल.

**Abstract (सारांश) :–**

काळया पैशाचे आणि अर्थकारणात फिरणाऱ्या रोकड रकमेचे एक घट्ट नाते असते. तसं पाहिले तर बेहिशोबी संपती ही सोने, जमिनजुमला, बेनामी मालमत्ता अशा निरनिराळया प्रकारामध्ये विखुरले गेलेली असते. पण तिची जननी असते भ्रष्टाचरामध्ये आणि करचुकवेगिरीमध्ये, करनियमन सोपे पण अभेद्द करणे, प्रशासन आणि निर्णयप्रक्रिया पारदर्शक बनवणं हि भ्रष्टाचाराच्या प्रवश्तीला पायबंद घालण्याची मूलभूत दिशा आहे. पण त्याच्या जोडिनेच काळया व्यवहारांना रोकड रकमेच्या सुळसळामुळे एक सोईचं आणि सुपीक वातावरण मिळते. ती रसद तोडण्यासाठी निश्चिलनीकरण आवश्यक वाटते. गेल्या काही वर्षामध्ये भारतात पाचशे आणि हजाराच्या नोटाचे प्रमाण वाढले आहे. सध्या चलनात असलेल्या रोकड रकमेपैकी ८६ टक्के रक्कम ही पाचशे आणि हजारांच्या नोटामध्ये आहे. मोठया नोटा जेवढया जास्त, तेवढे मोठया रकमेचे व्यवहार करणे सोपे असते. ज्यांना आपले काळे व्यवहार लपवायचे आहेत, कुमार्गाने मिळविलेली संपत्ती मालमत्तेत रूपांतर करावयाची आहे, करचुकवेगिरी करून व्यवहार करावयाचे आहेत त्यांच्या साठी रोकड रकमेसारखी दुसरी सोय नाही. काळया पैशाचा रोग



Scanned with OKEN Scanner